दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.२६ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

SHREE VAIBHAVLAXMI ENTERPRISES

URGENTLY REQUIRED

MALE CANDIDATES - FOR PROPERTY REGISTRATION
WORK IN PANVEL AND NAVI MUMBAI
MALE CANDIDATES - OFFICE BOY
MALE/FEMALE CANDIDATE -
FOR XEROX MACHINE OPERATOR WITH BASIC COMPUTER KNOWLEGE
E-MAIL-shreevaibhavlaxmienterprises@gmail.com MOB.NO. 9892848890
ADD. - SHOP NO.02, GROUND FLOOR, BULAND 2,
PLOT NO. 22, SECTOR 5A, NEW PANVEL, RAIGAD 410 206.

# नगरविकास खात्यावर फडणवीस नाराज, बैठकीला शिंदेंची दांडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महायुतीत सारं काही आलबेल आहे का? असा प्रश्न पुन्हा पडताना दिसतोय. कारण यावेळी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नाराजी नाट्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खात्यामधील अधिकाऱ्यांवर नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांची खरडपट्टी घेतल्याचं वृत्त एका वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. नगरविकास खात्याकडून केंद्र सरकार पैसा पुरवत असलेल्या योजना प्रभावितपणे राबवल्या जात नसल्याचा मुख्यमंत्र्यांचा आरोप आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सह्याद्री अतिथीगृह येथे नगरविकास खात्याची बैठक घेतली होती. या बैठकीत एकनाथ शिंदे उपस्थित नव्हते. या



बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली.

या बैठकीत प्रोटोकॉलनुसार एकनाथ शिंदे उपस्थित असायला हवे होते. तसेच त्यांनी स्वत:हून नगरविकास खातं मागून घेतलं होतं.

तरीही मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीत शिंदे यांनी दांडी मारल्यामुळे ते समाधानी नाहीत का? असा प्रश्न उपस्थित होतोय. यातून त्यांच्या नाराजीच्या चर्चांनी जोर धरला आहे.

> राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचं काम सुरु असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. अडीच वर्षांचं सरकार तुम्ही पाहिलेलं आहे. महायुतीची दुसरी इनिंग सुरु झाली आहे. यापूर्वीची पहिली इनिंग तुम्ही पाहिलेली आहे. विकासाच्या मुद्द्यालाच आम्ही पुढे घेऊन गेलो आहेत. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी आमची टीम काम करत आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

> केंद्राच्या अमृत योजनेच्या अंमलबजावणीत विलंब बोत असल्याचा मुख्यमंत्र्यांचं म्हणणं आहे. तसेच यामुळे त्यांनी अधकाऱ्यांच्या बैठकीत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. केंद्राकडून मिळालेल्या निधीचा पूर्ण उपयोग करा, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी आणि एकनाथ शिंदे काय उत्तर देणार? असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केला.

## विरोधकांची टीका, कारवाई करण्याची मागणी

दरम्यान, या वृत्तावर विरोधकांकडून टीका केली जात आहे. खासदार संजय राऊत यांनी शिंदेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. एकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री म्हणून पूर्णपणे अपयशी आहेत. नगरविकास खात्यातून मग एमएमआरडीए असेल, काही प्रकल्प असतील, नगरपालिका, महापालिका यांचा निधी केंद्रातून आला असेल आणि त्यांनी तो निधी इतरत्र वळवला असेल, ठेकेदारांच्या माध्यमातून कमिशनगिरी केली असेल तर हा भ्रष्टाचार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बडतर्फ केलं पाहिजे, असं संजय राऊत म्हणाले.

खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील कारवाईची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याच सरकारमधील एका विभागावर नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली. मी त्यांचं अभिनंदन करते. नाराजी दाखवली ती चांगली गोष्टी, पण त्यावर कारवाई काय होणार?, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला.

# माथेरान घाटात कुर्ल्यातील पर्यटकांचा अपघात; चार जखमी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कुर्ला-चेंबूर परिसरातील पाच पर्यटकांचा एक गट आज दुपारी माथेरान घाटात अपघातग्रस्त झाला. मारुतीच्या स्विफ्ट कारमध्ये बसून आलेल्या या कारमधील चार पुरुष जखमी झाले असून सोबत असलेली महिला सुखरूप आहे.

सोमवार २५ ऑगस्ट रोजी दुपारी कुर्ला येथील पर्यटक आपले वाहन नेरळ येथून माथेरान घाट चढत असताना, घाटातील अवघड वळण समजल्या जाणाऱ्या पिटकर पॉइंट येथील येस टन या वळणावर चढत असताना समोरील आलेल्या वाहनाला पाहून चालकाचे नियंत्रण सुटले.त्यामुळे रस्त्याच्या कडेला सुरक्षा रेलिंग नसल्यामुळे कार थेट दरीच्या बाजूला पडून खालील पुन्हा वळणाच्या रस्त्यावर आदळ-ली. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला.



ही कार प्रथम दर्शनी भागावर आदळून आडवी पडून मोठे नुकसान झाले, परंतु काळ आला होता परतू वेळ आली नसल्याने यातील सर्व पर्यटक सुखरूप बचावले.मात्र यामध्ये अपघातात वाहनातील प्रवास करणारे श्रीधर साळुंखे, सोहेल शेख, अहमद खान आणि आकाश गायकवाड जखमी झाले आहेत. एका पर्यटकांच्या डोळ्याला दुखापत झाली असून त्याला पुढील उपचारासाठी नेण्यात आले आहे.शिवाय दुसऱ्या पर्यटकाला डोक्याला तरी दोघांना काही जखमा झाल्या आहेत.

स्थानिक वाहनचालकांनी तत्परता दाखवत सर्व जखमींना बाहेर काढून नेरळ येथील शेवाळे रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, या वळणा-वर पूर्वीही अनेक अपघात झाले असून येथील अपघातात सुरक्षा रेलिंग तुटल्याने नव्याने येथे सुरक्षा रेलिंग बसवण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून झालेल्या हलगर्जीपणामुळे पुन्हा एकदा जीवितहानी टळली असली तरी गंभीर दुर्घटना घडली आहे.

# श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात संथ कारभार, अत्यावश्यक सेवेचे तीन तेरा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

**श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये अतिशय संथ गतीने कारभार सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. एखादा रुग्ण अत्यावस्थ असल्यास त्याला तातडीने दाखल करून घेताना, रुग्णालयातील वेगवेगळी प्रोसिजर पूर्ण होईपर्यंत अर्धा ते पाऊण तासाचा वेळ वाया जात आहे.सध्या श्रीवर्धन तालुक्या मध्ये वायरल तापाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे.गौरी गणपतीच्या सणासाठी आलेले कोकण वासीय देखील आजारी पडले आहेत. सर्वच रुग्ण शासकीय इस्पितळामध्ये उपचार घेण्यासाठी येत नसल्याने त्याचा निश्चित आकडा समजू शकत नाही.**



परंतु खाजगी दवाखान्यांमध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणावर रुग्णांची संख्या पाहायला मिळते. ताप, सर्दी, खोकला, अंग दुखणे इत्यादी आजार मोठ्या प्रमाणावरती उद्भवत आहेत. श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयात गेल्यानंतर केस पेपर काढण्यासाठीच अनेक वेळा ऑनलाइन सिस्टीम बंद असल्याचे दिसून येते. तसेच या ठिकाणी विविध आजारांसाठी डॉक्टर असून सुद्धा अनेक वेळा डॉक्टर त्यांच्या ड्युटीच्या वेळी कर्तव्यावर हजर नसल्याचे दिसून येते. रविवारी दुपारी याबद्दल एका रुग्णाला ताप आल्या कारणाने रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु सदर ठिकाणी असलेल्या आधी परिचारिकेने सदर ताप येणाऱ्या रुग्णाला गोळ्या देऊन उद्या सकाळी येण्यास सांगितले.

यावेळी देखील त्या ठिकाणी कोणीही डॉक्टर उपस्थित नसल्याचे दिसून आले. अनेक वेळा एखादा रुग्ण अत्यवस्थ असेल तर त्याला तातडीने उपच-राची गरज असते. परंतु त्या ठिकाणच्या कागदी घोडे नाचवण्यामध्येच नागरिकांचा वेळ जास्त वाया जातो. सध्या तापाचे रुग्ण जास्त असल्यामुळे बहुतांश रुग्णांना रक्त तपासण्याचा सल्ला देण्यात येतो. परंतु या ठिकाणी रक्ताचे सॅम्पल घेण्यासाठी सुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. तसेच सकाळी दहा ते दुपारी बारा एवढ्याच वेळात रक्त तपासणीसाठी घेतले जाते. त्यानंतर येणाऱ्या रुग्णांना खाजगी रक्त तपासणी करावी लागते. किंवा दुसऱ्या दिवसापर्यंत वाट पाहावी लागते.

■ तसेच रुग्णालयात व रुग्णालयातील स्वच्छतागृहांमध्ये स्वच्छतेची देखील ऐसी तैसी झालेली पाहायला मिळते. रुग्णांना बेडवरती अंथरण्यासाठी देणाऱ्या देणाऱ्या बेडशीट ह्या देखील अनेक वेळा अस्वच्छ असतात. सदर बेडवरती बेडशीट घालण्यासाठी रुग्णाच्या नातेवाईकांच्या हातात दिली जाते. रुग्णालयाचा कोणताही कर्मचारी बेडशीट घालण्यासाठी उपस्थित नसतो. काही अत्यावश्यक रुग्णांना वरच्या मजल्यावर घेऊन जाण्याचे असल्यास त्या ठिकाणी बॉयची संख्या देखील कमी आहे. त्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांनाच सदर रुग्णाला घेऊन वरती जावे लागते.

■ तसेच उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांसोबत एक नातेवाईक उपस्थित असतो परंतु सदर माणसाला बसण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था रुग्णालयात नाही. श्रीवर्धनचे उपजिल्हा रुग्णालय अतिशय सुसज्य करण्यात आलेले आहे. परंतु या ठिकाणी असलेल्या प्रशासनाचा ढिसाळ कारभार व कर्मचाऱ्यांची कमी संख्या यामुळे रुग्णालयाचा कारभार संथ गतीने चालला आहे की काय? असेच दिसून येते. याबाबत श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या बाल विकास व महिला मंत्री अदिती तटकरे यांनी तातडीने लक्ष द्यावे व या ठिकाणच्या रुग्णांना योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध होईल. याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.


### 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' मोहिमेंतर्गत 'पर्यावरणपूरक गणेश सजावट स्पर्धा'

# गणेशोत्सवासाठी महापालिका सज्ज

पनवेल,दि.२५: येत्या बुधवार पासून गणेशोत्सवास सुरूवात होत आहे. महापालिकेच्यावतीने गणेशोत्सवाची तयारी पुर्ण होत आली असून आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार बांधकाम विभागाच्यावतीने कृत्रिम तलाव, घनकचरा व आरोग्य विभागाच्यावतीने विसर्जन घाटाची साफसफाईचे काम अंतिम टप्प्यात आले आहेत .याबरोबरच पर्यावरण उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' मोहिमेंतर्गत पर्यावरणपूरक गणेश सजावट स्पर्धाआयोजित करण्यात आली आहे.

यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभाग व भांडार विभागाच्या १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर,निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

घनकचरा व आरोग्य विभागाच्यावतीने विसर्जन घाटांच्या स्वच्छतेची कामे जवळपास पुर्ण झाली आहे. पालिका क्षेत्रातील गणेश मंडळाच्या दारात जाऊन दररोज निर्माल्य गोळा करण्यासाठी महापालिकेने विशेष 'निर्माल्य संकलन रथ' तयार केले आहेत. हा उपक्रम मागील वर्षापासून पालिकेने सुरू केला असून यासाठी विशेष वाहनांची सोय करण्यात आली आहे. या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यात येणार आहे. विसर्जन दिवशी



विसर्जन घाटावरील स्वच्छतेसाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

गणपती विसर्जन घाटावर कोणतीही दुर्घटना होणार नाही यासाठी विद्युत विभागाच्यावतीने संपुर्ण काळजी घेण्यात आली असून, महापालिका कार्यक्षेत्रात सर्व स्ट्रीट लाईट सुरू राहतील याची खबरदारी घेण्यात आली आहे. सर्व विसर्जन घाटावर विद्युत सुरक्षितेदृष्टीने विद्युत उपकरणे, वायरिंग,जनरेटर संच इत्यादी सुस्थितीत ठेवण्यासाठीचे आदेश संबधित अधिकारी, ठेकेदार, व कर्मचारी यांची बैठक घेऊन अतिरीक्त आयुक्तांनी दिले आहेत.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत पर्यावरणाच्या रक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध उपक्रम आयोजित केले आहेत. यामध्ये पनवेल महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेश सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विजेत्यांसाठी एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. नागरिकांनी उत्साहाने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. याच बरोबर महापालिकेच्यावतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची सप्तसूत्री जाहीर करण्यात आली आहे.या सप्तसूत्रीचा नागरिकांनी अवलंब करावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने केले आहे.

# पनवेल शहर पोलिसांनी घेतले चार बांगलादेशीयांना ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार पनवेल शहर पोलिसांनी घेतले चार बांगलादेशीयांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी आखलेल्या विशेष मोहिमेत प्रतिबंधक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर व त्यांच्या पथकाने खुकुमिन अख्तर लिमा, वय २९ वर्ष, सध्या रा. अकुर आंगण बिल्डींग, रूम नं.२०१, गणपती मंदिराजवळ, सेक्टर आर/४, करंजाडे, खादिजा बेगम वय ४० वर्ष, सध्या रा. सेक्टर १९ येथील झोपडपट्टीत, कोपरखैरणे, अंजिला खातुन वय ५५ वर्ष, सध्या रा. सेक्टरयेथील झोपडपट्टीत, कोपरखेरणे, हानिफ शेख वय १३ वर्ष सध्या रा. सेक्टर १९ येथील झोपडपट्टीत, कोपरखैरणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाई मुळे बेकायदेशीररित्या पनवेल परिसरात वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशीयांचे धाबे दणाणले आहेत.

# भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन जयंती निमित्त पालिका मुख्यालयात अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन जयंती निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज(२५ ऑगस्ट) त्यांच्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# जीवावर उठलेली भूतदया

सर्व भटक्या कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रात ठेवण्याबाबत दिलेल्या मागील आदेशात सर्वोच्च न्यायालयाने काही प्रमाणात केलेली सुधारणा व्यावहारिक असली, त्यामुळे मूळ प्रश्न सुटेलच असे नाही. या संदर्भात राष्ट्रीय धोरण तयार करण्याचा निर्देश न्यायालयाने दिल्याने या प्रश्नातून नेमका कसा मार्ग काढावा, याबाबत भविष्यात स्पष्टता येऊ शकते. काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने 'सर्व भटक्या कुत्र्यांना निवारागृहांत ठेवावे,' असा आदेश दिला. त्याची अंमलबजावणी कशी करायची, या चिंतेने संबंधित यंत्रणा हबकल्या होत्या; तसेच श्वानप्रेमींनीही हा आदेश 'अमानवी' आणि 'अवैज्ञानिक' असल्याची टीका करून आंदोलनेही केली होती. दिल्लीतील आणि राष्ट्रीय राजधानीचा परिसर असलेल्या 'एनसीआर'मधील सुमारे सहा लाख कुत्र्यांना ठेवण्याइतकी निवारागृहे आहेत का, त्यांना सांभाळण्यासाठी शेकडो कर्मचारी-पशुवैद्यक आणि निधी आहे का आणि एवढ्या कुत्र्यांना एकत्र ठेवणे शक्य आहे का, असे अनेक प्रश्न त्यातून उभे राहिले होते. सुधारित आदेशात न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी काही उपाय सुचविले आहेत. या भटक्या कुत्र्यांना पकडल्यानंतर त्यांची नसबंदी- लसीकरण करून त्यांना मूळ जागी सोडावे, हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. त्याबरोबरच पकडलेल्या कुत्र्यांपैकी रेबीजची लागण झालेल्या किंवा आक्रमक कुत्र्यांना मात्र निवारागृहांतच ठेवण्यात यावे, असेही न्यायालयाने बजावले; तसेच रस्त्यांवर कुत्र्यांना अन्न खायला देऊ नये, त्यासाठी जागा निश्चित कराव्यात आणि त्यांचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल करावा, असे सांगून जबाबदार श्वानप्रेमाचा डोसही दिला आहे. गेल्या वर्षभरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याच्या सुमारे ३७ लाख घटना घडल्या असून, त्यापैकी पाच लाख घटनांमध्ये लहान मुलांवर हल्ले झाले आहेत. दरवर्षी ' रेबीज 'मुळे सुमारे १८ ते २० हजार जणांचा बळी जातो; त्यापैकी ९० टक्के घटना कुत्री चावल्याने घडतात, असे देशातील आकडेवारी सांगते. विशेषत: 'रेबीज'मुळे जगभरात जाणाऱ्या बळींमध्ये ३६ टक्के प्रमाण केवळ भारतामध्ये असल्याचे सांगून जागतिक आरोग्य संघटनेने या विषयाचे गांभीर्य ओधोरेखित केले आहे. देशात भटक्या कुत्र्यांची संख्या पाच कोटींच्या घरात असल्याचा एक अंदाज असून दिल्ली एनसीआरमध्ये त्यांची संख्या सहा लाख इतकी आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू-जखमी होण्याबरोबरच रात्री अपरात्री कुत्र्यांच्या झुंडीने अचानक हल्ला केल्याने दुचाकीस्वारांच्या अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. प्रामुख्याने 'प्रीव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू निमल(१९६१)' आणि 'निमल बर्थ कंट्रोल (डॉग) (२००१) ' या कायद्यांतील तरतुदींच्या आधारे भटक्या कुत्र्यांच्या विषयाचे नियमन केले जाते. त्यातील तरतुदींनुसार कुत्र्यांसह प्राण्यांना मारहाण करणे, हा गुन्हा आहे. या कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण करून पुन्हा त्याच परिसरात सोडण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे. या अंमलबजावणीतच या प्रश्नावरील उपाययोजनांचा फार्स सुरू होतो. भटक्या कुत्र्यांना पकडण्यापासून त्यांची नसबंदी आणि लसीकरणासाठी या स्थानिक स्वराज्य संस्थांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. त्यांच्याकडे पुरेसे पशुवैद्यक नाहीत, निवारा-उपचार केंद्रांची वानवा आहे आणि लशींचा साठाही नसतो. श्वानदंशाच्या घटनांबाबत आरडाओरडा झाल्यावर तोंडदेखली कारवाई करण्यात येते; इतर वेळी नसबंदीच्या आकडेवारीचे केवळ कागद रंगवले जातात. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढतच राहते, ही वस्तुस्थिती आहे. शहरातील कचऱ्याचे ढीग, रात्री हॉटेल किंवा खाद्यपदार्थांचा कचरा रस्त्याच्या कडेला सर्रास टाकण्याच्या प्रकारांतून या कुत्र्यांची संख्या वाढत जाते. या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना भलतीकडे अनोळखी भागांत सोडले, तर ही कुत्री हिंसक होतात आणि नवी कुत्री मूळ जागी येऊन प्रश्न कायम राहतो. भटकी आणि पाळीव कुत्रीदेखील रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जन करतात, त्यातून अस्वच्छता-रोगराईला निमंत्रण मिळते. भूतानसारख्या देशात शंभर टक्के भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीची उद्दिष्टपूर्ती झाल्याने हा प्रश्न सुसह्य झाल्याच आढळून येते. भारतातील कुत्र्यांचा प्रश्न तेवढा सोपा नसला, तरी नवे धोरण ठरविताना इतर देशांतील परिस्थिती, कायदे आणि उपाययोजनांचाही अभ्यास गरजेचा असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना या कामासाठी मनुष्यबळ आणि निधीची आवश्यकता आहे. सातत्यपूर्ण उपाययोजनांतूनच क्रौर्य किंवा प्राणिप्रेम यांपैकी कोणतेही टोक न गाठता माणसांची सुरक्षा आणि भूतदया यांच्यात संतुलन साधून मार्ग काढावा लागेल.

# पाली खोपोली राज्य महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

वाकण पाली खोपोली राज्यमहामार्ग मागील अनेक वर्षांपासून मृत्यूचा सापळा म्हणून ओळखला जातोय. या महामार्गावर आजवर अनेक जीवघेणे अपघात होऊन हजारो निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. रस्त्याच्या दुरावस्थेचा फटका प्रवाशी व वाहनचालक यांना मोठ्या प्रमाणावर बसत आहे. महामार्गावर सध्या ठिकठिकाणी जीवघेणे खड्डे पडले आहेत. खडी, दगडगोटे व चिखलाने तर रस्त्याची भयावह अशी दुरावस्था झाली आहे. रस्त्यावरील खड्ड्यांनी जनता अक्षरशः बेजार झाली आहे. या मार्गावरून प्रवास करताना पाली खोपोली राज्य महामार्ग आहे की डोंगर कड्या कपारीची वाट आहे असा संताप स्थानिक व प्रवाशी व्यक्त करतात.



प्रवाशांना खड्ड्यातून जाता येता होणाऱ्या आदळ आपट मुळे नौका नयनाचा अनुभव येतो. रस्ता खस्ता खात असताना शासन, राज्यकर्ते ,एम एस आर डी सी प्रशासन, ठेकेदार मात्र निद्रिस्त अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. वाकण पाली खोपोली राज्यमहामार्ग ३९ किमी इतका लांबीचा असून सदर रस्त्याचे काम २०१६ पासून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माध्यमातून सुरू आहे, मात्र आज मितीस या रस्त्याची दुरावस्था पाहता रस्त्याच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. या मार्गावर पाली मिनिडोअर रिक्षा स्टॅण्ड , प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ व इतर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रस्ता फुटल्याने खड्ड्यातून प्रवास करण्याची नामुष्की प्रवाशी जनतेवर ओढवले आहे. या खड्ड्यात वाहने आदळून नागरिकांची कंबर , मान व पाठीचे आजार वाढत आहेत, तर वाहने खड्ड्यात आपटल्याने वाहनात बिघाड होऊन वाहन चालकांच्या खिशाला कात्री लागत आहे. गणेशोत्सव तोंडावर आला आहे, रस्ता खड्डेमय झाला आहे. अशातच कोणत्याही प्रकारची रस्ता दुरुस्ती, डागडुजी होत नसल्याने एम एस आर डी सी प्रशासन अधिकारी गलेलठ्ठ पगार घेऊन केवळ खुर्च्या उबवित आहेत का? असा संताप स्थानिक , प्रवाशी व वाहन चालकातून उपस्थित होत आहे.

दरम्यान रस्त्याच्या दुरावस्थेबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी एम एस आर डी सी च्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी केला असता कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे वारंवार दिसून आले आहे. त्यामुळे जनता संकटात असताना हा विभाग नेमका कुणाच्या नियंत्रणात काम करतो, अकार्यक्षम अधिकारी यांच्यावर राज्य सरकार मधून कुणाचा वचक आहे की नाही ? असा सवाल देखील जनतेतून उपस्थित होत आहे.

# गणेशभक्तांना श्रीफळांचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील गणेशभक्तांना यावेळी एक पर्वणीच असून सढळ हाताने मोफत साहित्य देण्यासाठी दानशूर हात सरसावले आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य वाटपाचा कार्यक्रम दोन दिवसांपासून सुरू आहे याचा लाभ घरगुती गणेशोत्सव, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ घेत आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद नायक आणि नरेश परदेशी यांच्या माध्यमातून आज गणेशभक्तांना गणेश पूजेसाठी पाच (नारळ) श्रीफळांचे वाटप करण्यात आले याचा गणेशभक्तांनी लाभ घेतला.



# आले...आले... पनवेलचे 'महागणपती' आले!



**दै.रायगड नगरी । पनवेल**

परंपरा, भक्ती, उत्साह आणि ऐश्वर्य यांचा मिलाफ असलेल्या 'पनवेलचा महागणपती'च्या आगमन सोहळ्याने रविवारी पनवेल नगरी दुमदुमून गेली. सार्वजनिक गणेशोत्सवातून प्रबोधन आणि जनजागृतीसह निखळ भक्तीची शिकवण देणाऱ्या कांतीलाल प्रतिष्ठान रायगडने यंदा १४ व्या वर्षी 'पनवेलचा महागणपती'चे आयोजन केले आहे. वरुणराजाने हजेरी लावत महागणपतीचे जोरदार स्वागत केले. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषांनी संपूर्ण पनवेल पंचक्रोशी दणाणून सोडले.

सकाळी मुंबईतील कारखान्याबाहेरील गणेशभक्तांची गर्दी व्यापून 'पनवेलचा महागणपती'ने सायंकाळी पनवेलच्या ऐतिहासिक भूमीत आगमन करताच, अवघी पनवेल नगरी रोमांचित झाली. पनवेल बस स्थानकासमोरील उड्डाणपुलाखाली बाप्पाचे रूपा कडू, मिनाक्षी मुंबईकर, प्रिया पाटील, कल्पना मुंबईकर, अहिल्या मुंबईकर, श्वेता मुंबईकर, अक्षता मुंबईकर, जुईली मुंबईकर आदी सुवासिनींनी औक्षण केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई-लालबाग येथील प्रख्यात मूर्तिकार निखिल राजन खातू यांच्या कलेचा मूर्तिमंत आविष्कार पहायला मिळाला. कांतीलाल प्रतिष्ठानचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांच्या संकल्पनेतून बाप्पाची विठ्ठल रूपातील एकदम भव्यदिव्य आकर्षण, देखणी, मनोहरी मूर्ती न्याहाळताना पनवेलकरांचे चैतन्य सळसळत होते.

फटाक्यांच्या आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या निनादात पनवेलच्या मानाच्या महागणपतीने आगमन करताच सर्वत्र भक्तिभावाचा सागर उसळला. आगमन मिरवणुकीतील प्रमुख आकर्षण ठरले पनवेलमधील 'मी तक्केकर: कोळी बिट्स'. त्यांच्या वादन पथकाने आकाश दणाणून सोडले. 'नादब्रह्म'चा हा अनुभव भाविकांना मंत्रमुग्ध करत होता.

महागणपती आल्याची वर्दी पनवेलकरांना मिळताच, बाप्पाची पहिली झलक कॅमेऱ्यात टिपण्यासाठी गणेशभक्तांनी गर्दी केली होती. वाहन चालक, प्रवाशांसह पादचाऱ्यांचे हात फोटो काढण्यासाठी उंचावले होते. पनवेलचा महागणपती केवळ स्थानिकांसाठीच नव्हे तर संपूर्ण रायगड, मुंबई आणि पुण्यासह राज्यभरातील भाविकांसाठी श्रद्धेचे केंद्र बनला आहे. त्यामुळे आगमन सोहळ्यासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. गणरायाचे दर्शन घेण्यासाठी केवळ पनवेलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे अनंत चतुर्दशीपर्यंत पनवेल शहर उत्सवाच्या नगरीत रूपांतरित होणार आहे.

# स्पर्धेला टक्कर देण्याची तयारी असेल तर मागे राहणार नाही : सुभाष देसाई

**दै.रायगड नगरी । माणगाव**

सर्व स्पर्धेला टक्कर देण्याची तयारी असेल तर आपण मागे राहू शकत नाही. रिझल्ट काय असेल याची पर्वा न करता आपण स्पर्धेत उतरलो पाहिजे. जिद्द बाळगली तरच आपण अनेक क्षेत्रात पुढे येऊ असे माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी माणगाव येथील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकम भाई मेथा कॉमर्स कॉलेज येथे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप प्रसंगी म्हणाले.

माणगाव येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे सोमवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील ६० विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपयांचा धनादेश वाटप करण्यात आला.

शिवाजी मंदिर दादर व सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप केली जाते. शिवाजी मंदिर दादरचे सरचिटणीस चंद्रकांत ज. सावंत उर्फ अण्णासाहेब सावंत व जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी व शिवाजी मंदिर दादरचे संचालक नानासाहेब सावंत यांच्या प्रयत्नातून दरवर्षी ज्यूनियर कॉलेज व सीनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दोन ते तीन लाख रुपये शिष्यवृत्ती दिली जाते तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे ज्ञान मिळावे यासाठी कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केले असून शिवाजी मंदिर दादर व सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट मुंबई यांनी दीड लाख रुपयांची स्पर्धा पुस्तके व संदर्भ पुस्तके भेट दिली आहेत. या कार्यक्रमाला नानासाहेब सावंत, रामदास पुराणिक, डॉ. अमृता देशमुख, प्रा. हर्षल जोशी,प्रा. अशोक मोरे, प्रा. डॉ. नितीन मुटकुळे, डॉ. जगदीश शिगवण, प्रा. भारत पवार, प्रा. सौ. सायगावकर, प्रा. अमित बाकाडे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अमृता देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.



### स्मार्ट गव्हर्नन्स व आदिवासी सशक्तीकरण या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी...

# कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरासाठी सामंजस्य करार महत्त्वाचा ठरणार : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाकडे महत्त्वाचे पाऊल टाकत स्मार्ट गव्हर्नन्स व आदिवासी समाजाचे सशक्तीकरण या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरासाठी सामंजस्य करार महत्त्वाचा ठरणार असून, हा सामंजस्य करार आमच्या विभागासाठी डिजिटलदृष्ट्या सक्षम आदिवासी कल्याण प्रणाली घडविण्याच्या मिशनमधील नवा अध्याय असल्याचे मत कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यकत केले.



कोंकण विभागीय आयुक्त कार्यालय, नवी मुंबई आणि विजयभूमी विद्यापीठ, जामरूंग, ता. कर्जत जि. रायगड यांच्यात आज विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि विजयभूमी विद्यापीठाचे प्रो-चान्सलर व माजी महासंचालक डॉ. अश्विनी कुमार शर्मा, विजयभूमी स्कूल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी शाखेचे प्रमूख डॉ. सलूर श्रीकांत पटनाईक, यांनी स्वाक्षऱ्या केल्या. डॉ. पटनाईक हे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बुद्धिमान प्रणाली या क्षेत्रातील अनेक दशकांचा संशोधन व विकासाचा अनुभव असलेले मान्यवर तज्ज्ञ आहेत. यावेळी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक कर) रविंद्र पवार, सहायक संचालक लेखामेळ शाखा दिपक काटे, विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंपादक प्रविण डोंगरदिवे उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले की, हा सामंजस्य करार आमच्या विभागासाठी डिजिटलदृष्ट्या सक्षम आदिवासी कल्याण प्रणाली घडविण्याच्या मिशनमधील नवा अध्याय आहे. सेवांचे व्यवस्थापन, देखरेख आणि वितरण अधिक सुलभ व आधुनिक करण्यासाठी हा निर्णायक टप्पा आहे. विजयभूमी विद्यापीठासोबतची ही भागीदारी आम्हाला केवळ (एआय) स्वीकारण्यास मदत करणार नाही, तर नागरिककेंद्रित व समतोल पद्धतीने, उद्देशपूर्ण आणि नैतिक रीतीने त्याचा वापर घडवून आणेल. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या प्रो-ऍक्टिव्ह, प्रेडिक्टिव्ह आणि पीपल-सेंट्रिक गव्हर्नन्स या दृष्टीकोनाशी आम्ही पूर्णपणे सुसंगत आहोत. या करारामुळे योजनांच्या अंमलबजावणीस गती मिळेल व वेळेचे काटेकोर पालन होईल. संसाधनांचे वितरण व गरजांचा अंदाज वर्तवण्यासाठी प्रेडिक्टिव्ह ॲनॅलिटिक्सचा वापर सुलभतेने करता येईल. रिअल-टाइम मॉनिटरिंगसाठी (एआय) आधारित डॅशबोर्डचा उपयोग होईल. प्रादेशिक भाषांमध्ये नागरिकांसाठी डिजिटल अनुप्रयोग करता येतील. अधिकाऱ्यांना मदत करणारी (एआय) आधारित निर्णय सहाय्य प्रणाली विकसीत होईल. प्रशिक्षण व कौशल्यविकासाद्वारे विभागाची डिजिटल क्षमता वाढेल. आदिवासी कल्याण योजनांचे रिअल-टाइम (एआय)-आधारित मॉनिटरिंग करता येईल. सेवा वितरण वेळेत ३०-५०% घट होईल. आदिवासी भाषांमध्ये मोबाइल-आधारित डिजिटल सहाय्यक तयार करण्यात येतील.

या भागीदारीतून आदिवासी कल्याण योजनांची अंमलबजावणी जलद व प्रभावी करण्यासाठी (एआय) साधनांचा वापर होणार असून, संसाधनांचे नियोजन, रिअल-टाइम मॉनिटरिंग, प्रादेशिक भाषांतील डिजिटल सेवा, निर्णय सहाय्य प्रणाली व कर्मचाऱ्यांचे कौशल्यविकास यावर भर दिला जाणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड**
**ई-मेल :-** eerid24@gmail.com **दुरध्वनी क्र.** ०२१४०/२५०८५७
**निविदा सूचना क्र.०९ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. (GST Insurance and Royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पूर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोरबे ल.पा. योजना, आंबेघर ल.पा. योजना, पुनाडे ल.पा. योजना. बामणोली ल.पा. योजना येथील अनिवासी चौकीची उर्वरित दुरुस्ती, संरक्षक गेट करणे, सूचना फलक लावणे व विभागाच्या मालकीचा अनिवासी चौकी ते धरण पोहोच रस्त्यावरील खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम व इतर अत्यावश्यक अनुषंगिक कामे करणे, जि. रायगड | २,३४,१५, ११२/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- +रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागू नाही |

निविदा उपलब्ध कालावधी दि. २६/०८/२५ ते दि. ०२/०९/२०२४
ई-निविदा उघडण्याचा दि. ०३/०९/२०२५
खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ताः कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid24@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

टिपः- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

**सही/-**
**(इंजि. मिलींद पवार)**
**कार्यकारी अभियंता. रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

दैनिक रायगड नगरी मंगळवार, दि.२६ ऑगस्ट २०२५

# भाजपच्या वतीने गणेशभक्तांना मोफत पूजेचे साहित्य वाटप



**दै.रायगड नगरी । माथेरान**

दहा वर्षांपासून घरगुती गणेशोत्सव व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना एकूण २० प्रकारचे दर्जेदार पूजेचे मोफत साहित्य वाटण्यात येते यावर्षी देखील सदरचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

माथेरान शहर भारतीय जनता पक्ष अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी यांच्या विशेष पुढाकाराने दि.२४ रोजी सकाळी अकरा वाजता श्रीराम चौकात भाजपच्या वतीने पूजेचे साहित्य वाटप करण्यात आले यावेळी या सुवर्णसंधीचा लाभ समस्त गणेशभक्तांनी घेतला. माथेरान मध्ये भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आजवर अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत असून जनतेच्या हिताच्या दृष्टीने नेहमीच भाजपचे कार्यकर्ते सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वेळोवेळी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येते. तर गरजवंत व्यक्तींना आधार देऊन सत्कार्य करत आहेत. मागील दहा वर्षांपासून ही मंडळी समस्त गणेशभक्तांना मोफत पूजेचे साहित्य वाटप करीत असून त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, प्रदीप घावरे, आकाश चौधरी, राजेश चौधरी, विजूभाई चौधरी, संदीप कदम, शैलेश चाफेरकर, दीपक शहा, राकेश चौधरी यांसह अन्य पक्षाचे मित्र परिवार सुध्दा या स्तुत्य उपक्रमात उपस्थित होते. यावेळी बोलताना चंद्रकांत जाधव म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून माथेरान भाजपच्या वतीने माथेरान शहरातील घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव साजरी करणाऱ्या नागरिकांना श्री गणेशाची पूजा अर्चा करन्यासाठी लागणारे सर्व साहित्य नेरळ अथवा अन्य ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या दुकानात घ्यावे लागत असे सर्वांनाच हे साहित्य इथेच उपलब्ध व्हावे केवळ या संकल्पेनेतून हा सुरु केलेला उपक्रम हा सर्वांनाच आनंद देणारा आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकत कायम खरेदी करण्याबाबत.

आमचे अशिलांनी जमिनीचे मालक यांच्या सोबत रितसर जमिन खरेदी करारनामा केलेला आहे. सदर जमिन खरेदी करारनामा पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे– नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| २३ | २ | १–२५–४० पो.ख. ०–०४–६० एकूण ०–६८–२० | १७.४४ |
| २५ | १ | ०–६८–२० पो.ख. ०–१०–१० एकूण ०–७८–३० | ५.१९ |

सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे १५ दिवसांत खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदी करतील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२५/०८/२०२५

सही/–
कुमार ॲण्ड असोसिएटस्
**ॲड.अरुण कुमार**
७–८, निलकंठ दर्शन, पनवेल बस स्टॉपसमोर,
मुंबई–पुणे हायवे, पनवेल–४१०२०६
फोन नं.०२२–२७४५६१९१
मो.नं.८१०८८२४००२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकत कायम खरेदी करण्याबाबत.

आमचे अशिलांनी जमिनीचे मालक यांच्या सोबत रितसर जमिन खरेदी करारनामा केलेला आहे. सदर जमिन खरेदी करारनामा पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे– पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६६१/३ | ०–४३–२ | २–६९ |

सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे १५ दिवसांत खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदी करतील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२५/०८/२०२५

सही/–
कुमार ॲण्ड असोसिएटस्
**ॲड.अरुण कुमार**
७–८, निलकंठ दर्शन, पनवेल बस स्टॉपसमोर,
मुंबई–पुणे हायवे, पनवेल–४१०२०६
फोन नं.०२२–२७४५६१९१
मो.नं.८१०८८२४००२

# चिरनेर कुंभारवाड्यातील ३५ कुटुंबियांची पारंपरिक व्यवसाय टिकून ठेवण्यासाठी तगमग

## अखेरचा दिवस असतांना शेवटचा हात फिरवण्याच्या कामात कारागीर मग्न

**दै.रायगड नगरी । उरण**

लाडक्या बाप्पाच्या आगमनाला शेवटचा दिवस शिल्लक असून,उरण तालुक्यातील चिरनेर येथील कुंभारवाड्यात शाडू गणपतीच्या मूर्तीवर रंगरंगोटीचा अखेरचा हात फिरविण्याचे काम सुरु आहे.शाडूच्या सुबक मूर्तिचे माहेरघर म्हणून चिरनेरच्या गणेशमूर्ती मागील कित्येक वर्षांपासून प्रसिद्ध आहेत.

कुंभारवाड्यातील कारागीर आणि रंगकाम करणारे कलाकार आपल्या अवगत कलेला आकार देऊन वेगवेगळ्या रुपात बाप्पाला साकारण्याच्या कामात मग्न आहेत. गणेशोत्सवाचा उत्साह तालुक्यासह परिसरात मोठ्या प्रमाणात जाणवू लागला आहे. उरण तालुक्यातील केगाव, मोरा, मुळेखंड, खोपटे, गोवठणे बोकडविरा आणि इतर ठिकाणी गणेशमूर्ती आकार घेत आहेत. तर चिरनेर कुंभारवाड्यातील ३५ कुटुंबे पारंपरिक पद्धतीने मूर्ती साकारत आहेत. दरवर्षी साधारणतः ८०० शाडूच्या गणेशमूर्ती मुंबई, ठाणे, नवीमुंबई व रायगड जिल्ह्यासह इतर ठिकाणी पाठविल्या जात आहेत. शाडूच्या मूर्तिचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सुबक आखणी, आकर्षक सिडींगची रंगोटी व भावमुद्रांमुळे मूर्तिना जिवंतपणा येतो.

त्याच प्रमाणे या मूर्ती पर्यावरण पूरक असल्याने या मूर्तिना पहिली पसंती मिळते.विसर्जनानंतर शाडूच्या मूर्ती पाण्यात अवघ्या काही वेळात विरघळतात.त्यामुळे शाडूच्या मूर्तीची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याचे येथील कारखानदारांनी सांगत आहेत.येथील मूर्तिचा आकार साधारणतः एक फुटांपासून चार फुटांपर्यंत बनविण्यात येत असून,चिरनेर कुंभारवाड्यातील कलेवरून पाचवी पिढी कार्यरत असून,पारंपरिक साक्षरता जोपासली जावी हा त्यांचा हेतू आहे.एक ते चार फुटांपर्यंत विविध आकाराच्या मूर्ती तयार होतात.

तर काही वर्षात मजुरीत सातत्याने वाढ,जीएसटीआणि कच्या मालाच्या किमतीच्या वाढीमुळे मूर्तिच्या किंमतीत सुमारे चाळीस टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय सोशल मीडियावर वेगवेगळ्या शैलीतील गणेशमूर्ती पाहून काही कारखान्यात मूर्तिचे नवे रुप साकारले जात आहे. बाळगणेशापासून ब्रम्हा, विष्णू महेशापासून, साईबाबा, पगडीवाला, पेशंवाई आणि लालबागच्या राजाला अधिक पसंती आहे. मूर्तिमध्ये नेत्राची रेखीव मांडणी, भावमुद्रेला प्राधान्य दिले जात असून,मूर्तितील



जिवंतपणा दाखविण्यासाठी रंगसंगती, भावमुद्रा आणि आखिव रेखांचे कारागीरांचे कौशल्य अत्यंत महत्वाचे असल्याचे मूर्तिकार सांगत आहेत.

> आत्ता एक दिवसावर आगमन येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाची धामधूम असूनही पारंपरिक कला टिकविण्यासाठी कुंभारवाड्यातील कारागीर आपली मेहेनत आणि कला यांची ओळख कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पर्यावरण पूरक आणि सुंदर गणेशमूर्ती या गणेशोत्सवाचा एक विशेष भाग बनण्यासाठी उत्सुक आहेत.
>
> **प्रसाद चौलकर, मूर्तिकार – चिरनेर**
>
> पर्यावरण पूरक मूर्ती घडविणारे गाव म्हणून चिरनेरच्या कुंभारवाड्याची ओळख आहे.मात्र पॉली फायडरी मूर्तिच्या सुलभ उपलब्धतेमुळे हे व्यवसाय आत्ता संकटात आले आहेत.शाडूच्या मूर्ती घडविणे ही आमची दैवी देणगी आहे. परंतु महागाईमुळे आणि लोकांच्या बदलत्या पसंतीमुळे आमच्या पोटावर पाय ठेवले जात आहे.
>
> **नंदकुमार चिरनेरकर, मूर्तिकार – चिरनेर कुंभारवाडा**

### जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे दुवा बिल्डकॉन एल एल पी तर्फे भागिदार १) शाहजहान याह्या खान २) फिरोज बुनियाद अली शेख पत्ता:– ऑफीस नं १४९, सेंट्रल फॅसिलिटी बिल्डींग, मार्केट–२, सेक्टर–१९ तुर्भे वाशी नवी मुंबई ४००७०५ हे खालील नमुद भुखंड १) श्री कृष्णा काथोर नाईक २) श्री लक्ष्मण काथोर नाईक ३) श्री गणेश जयराम नाईक ४) श्रीमती सुलोचना जयराम नाईक उर्फ सुलोचना गणेश म्हात्रे ५) श्रीमती विनिता जयराम नाईक उर्फ विनिता संजय ठाकुर ६) श्रीमती कविता जयराम नाईक उर्फ कविता हरेश घरत ७) श्रीमती बानुबाई पंढरीनाथ भगत सर्व जण राहणार घर नं ४९२, वी, खालची आळी बामणडोंगरी, ४१०२०६ तालुका –पनवेल, जिल्हा रायगड

**मिळकतीचे वर्णन–**
**संचिका क्र– वहाळ – ३३**
**भूखंड क्र–७४, सेक्टर–६,**
**मौजे वहाळ नोड पुष्पक (दापोली) क्षेत्रफळ ८०.०० चौ मी**

तरी याबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किवा आर्थीक संस्थाचे भुखड संदर्भात तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे. न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती, जसे विक्रि, बोजा, दान, गहान, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किवा इतर काही असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाचे आत कागद पत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.२५/०८/२०२५

सही/–
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
शॉप नं.१३, प्रभात सेंटर,
सीबीडी–बेलापूर

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, मौजे : पहुर, ता. रोहा, जि. रायगड येथील पुढील वर्णनाची जमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल श्री.रतिश तुकाराम गायकवाड यांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पहुर, ता.रोहा, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | भुधारणा पद्धती क्रं. | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| विवेक संग्राम केसरी पाढी | वर्ग–१ | ८६२ | ०.५४.९० वरकस १.५५.४० लागवडी योग्य क्षेत्र २.१०.३० पो.ख. ०.४५.४० | ७.५७ |

**एकूण क्षेत्रापैकी विवेक संग्राम केसरी पाढी यांच्या हिश्श्याची २० गुंठे जागा विकत घेणे आहे.**

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरिक्त सदर मिळकती संदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिन्हाईतांचे गहाण, दान, बक्षीस, उपरोक्त करारनामा, लीज, चार्ज, ॲटचमेंट, कुळहक्क, ताबा, कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा मनाई, आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर कोणत्याही प्रकारचे कुणाचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालीलप्रमाणे दिलेल्या पत्त्यावर सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दि.२५/०८/२०२५

सही/–
**ॲड.मनोज एस. गाढवे**
BSL.LL.B
(उच्च न्यायालय)
शॉप क्रमांक १०१ नगरपालिका कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ जुने पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
मो नं. ८७७९६९३७९२/९८३३९६६३०४

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका पनवेल पैकी मौजे अजिवली येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९ | २ | ०–२४–० पैकी ०–१२–० | ०१=४० |

वर नमूद मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे व त्याबाबत बोलणी केलेली आहेत. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.२५/०८/२०२५

सही/–
**ॲड.प्रतिक्षा प्रकाश वडे**
**उर्फ ॲड. सौ. प्रतिक्षा सुयोग वारंगे**
मु. १०२, पवन को.ऑप. हौ. सोसायटी, लोखंडीपाडा,
पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १. श्री मनोहर हसुराम म्हात्रे २. श्री एकनाथ हसुराम म्हात्रे ३. श्री नामदेव हसुराम म्हात्रे ४. कुमारी पायल भालचंद्र म्हात्रे राहणार : ३४५– २, सेंन्ट्रल जेल रोड, सेक्टर ३७, इनामपुरी, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१० यांना सिडको लि, कडून मौजे नोड खारघर, येथील फाईल नं. ४३९ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाला आहे त्याप्रमाणे माझे अशिल मे फॉरचून बिल्डर्स ॲड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री अब्दुल लतीफ महमूद मिया मदार २) श्री वसीम अब्दुल सत्तार पटेल ३) श्री नवनाथ नामदेव म्हात्रे राहणार : शॉप नं ०५, प्लॉट नं १०१, सेक्टर नं ३९, खारघर नवी मुंबई ४१०२१० यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, विकासकरारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक : ४३९ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३५ ई | ६८ ए | २९८.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.२५/०८/२०२५

सही/–
**ॲड.सुजाता जो. पाटील**
शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा,
सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई–४१०२१०
मो.नं.८८७९४१६४८३


### वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



### गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, अ. मे आर डी बिल्डर तर्फे भागीदार १. श्री रामआशिष डी पांडे २. श्री संतोष आर पांडे पत्ता : ऑफिस ५०६/५०७, डीस्मा कॉम्प्लेक्स, प्लॉट नं २४६, के डब्लू सि, कळंबोली नवी मुंबई ४१०२१८ (५० टक्के) व. १. श्री भिकाजी बामा पाटील के रमेश बामा पाटील मयत त्यांचे वारस १. श्रीमती शारदा रमेश पाटील २. श्री विकास रमेश पाटील ३. श्री प्रशांत रमेश पाटील ४. श्री आकाश रमेश पाटील (५० टक्के) राहणार : पेंधर, तालुका पनवेल जिल्हा रायगड यांना सिडको लि, कडून मौजे नोड तळोजा येथील फाईल नं १०५५ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे हस्तांतरणआमच्या नावे झालेले आहे त्याप्रमाणे माझे अशिल मे अथर्व रिअलिटी तर्फे भागीदार १. श्री किरण भिकाजी पाटील २ श्री नितेश बाळकृष्ण पाटील ३. बाळाराम सुधाम पाटील राहणार : ८७२, अरिहंत अंशुलाचे समोर, घोट गाव, पोस्ट घोट कॅम्प, तालुका पनवेल जिल्हा रायग्ड ४१०२०८ यांनी खालील वर्णन केलेला भूखंड क १८, सेक्टर २२सी, क्षेत्र ११४९.६६ चौ. मी पैकी मे आर डी बिल्डर तर्फे भागीदार यांच्या हिस्याचे ५० टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल नं १०५५ तळोजा**

| नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २२ सी | १८ | ११४९.६६ चौ.मी पैकी आर डी बिल्डर तर्फे भागीदार यांच्या हिस्याचे ५० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा–या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दि.२५/०८/२०२५

सही/–
**ॲड.सुजाता जो. पाटील**
शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा,
सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई–४१०२१०
मो.नं.८८७९४१६४८३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकती नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसूचित होऊन सदर जमिनींचा निवाडा घोषित झालेला आहे. सदर जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरीता संपादित झाल्यामुळे सिडकोच्या १२.५ टक्के योजनेनुसार संबधित जमिन मालकांना सिडको तर्फे विकसीत भूखंड देण्यात येणार आहेत. सदरहू सर्व भूखंड आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याबाबत भुखंड खरेदी करारनामा संबंधित मालकासोबत केलेला आहे. सदरच्या जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**सिडको संपादित जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:–**
**मौजे– पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**
**युनिट केस नंबर ४९८/अ**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १७६ | ३ पै | ०–३२–९ |
| १९१ | २ अ | ०–९१–१ |
| १९१ | १ ब | ०–४०–७ |
| १९१ | १ (फ) | ०–६३–७ |
| १९२ | १ (१) | २–५०–७ |
| २१० | ० | २–६०–३ |
| २११ | ३ | १–५६–८ |
| २१३ | १ (पै) | ०–५३–७ |
| २१३ | ३ | ०–९५–७ |
| २१४ | २ | ०–३३–४ |
| २१४ | ३ (पै) | ०–०७–६ |
| २१४ | ४ (पै) | ०–४२–५ |
| २१४ | ५ | ०–२१–२ |
| २१४ | ६ (पै) | ०–४१–० |
| २१४ | ७ (पै) | ०–५१–६ |
| २२० | | ०–४७–० |
| | | पैकी एकूण १२–८९–९ |

सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच हरकत नोंदवावी. सदर बाबत कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात कागदपत्रासह खालील सही करणार यांचेकडे १५ दिवसांत खालील पत्त्यावर लेखी दाखल करावी. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदी करतील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२५/०८/२०२५

सही/–
कुमार ॲण्ड असोसिएटस्
**ॲड.अरुण कुमार**
७–८, निलकंठ दर्शन, पनवेल बस स्टॉपसमोर,
मुंबई–पुणे हायवे, पनवेल–४१०२०६
फोन नं.०२२–२७४५६१९१
मो.नं.८१०८८२४००२

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धे च्या पुरुष गटात म्हसळ्याच्या श्री. सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळाने तर महिला गटात कर्जतच्या शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक जयंत पगडे, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्यासह वारकरी संप्रदायातील मान्यवर तसेच आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

पुरुष गटात द्वितीय क्रमांक सुरताल भजन मंडळ नारंगी, तृतीय क्रमांक श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघरने तर उत्तेजनार्थ पारितोषिक अलिबागच्या स्वरविहार भजन मंडळाने पटकावले. यामध्ये उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून श्री. हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे कुणाल पाटील आणि उत्कृष्ट तबला वादक भूषण गायकर ठरले. महिला गटात द्वितीय क्रमांक आई एकविरा महिला भजन मंडळ दुन्द्रेपाडा, तृतीय क्रमांक श्री. सद्गुरूकृपा प्रासादिक महिला भजन मंडळ चिंचवली आणि उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ नेरळ यांनी पटकाविले. उत्कृष्ट पखवाज वादक म्हणून कै. वैयजंती माता भजन मंडळ रसायनीचे ओमकार तराळे तर आई एकविरा भजन मंडळाचे रोहन पाटील उत्कृष्ट तबला वादकचे मानकरी ठरले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात ही स्पर्धा रंगली. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरलेल्या विजेत्या मंडळाला प्रत्येकी ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील यांनी काम पाहिले.

# भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना विद्यार्थ्यांच्या सोबत उभी राहील : बबन पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष विद्यार्थ्यांच्या सोबत उभी राहील असे प्रतिपादन शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी पनवेल विधानसभेतील पाली देवद शाखेत उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शिवसेना शाखा प्रमुख माने यांच्या माध्यमातून दहावी बारावी मधील गुणवंत विद्यार्थी आणि वीज वितरण कंपनीतील कार्यतत्पर योद्ध्यांचा सत्कार करताना केले.

यावेळी शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, मा. नगरसेवक अतुल पलन, युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते, विधानसभा अधिकारी अजय पाटील, पाली देवद शाखेत उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शिवसेना शाखा प्रमुख माने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले की भविष्यात येणाऱ्या सर्व शैक्षणिक अडचणींमधे शिवसेना त्यांच्या सोबत उभी राहील आणि त्यांच्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत करण्यात येईल. यावेळी परिसरातील विद्यार्थ्यांचा व वीज वितरण कंपनीतील कार्यतत्पर योद्ध्यांचा सत्कार करण्यात आला .



# अलिबागमधील जमीन प्रकरणात सुहाना शाहरूख खान अडचणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानची लाडकी लेक सुहाना खान सध्या चर्चेत आहे. तिने आलिबागमध्ये शेती करण्यासाठी १ जून २०२३ रोजी दीड एकर जमीन विकत घेतली आहे. जमिनीचा व्यवहार आणि नोंदणीदेखील १ जून रोजीच झाली होती. या जागेची एकूण किंमत १२.९१ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या दीड एकर जागेत २२१८ चौरस फूट बांधकामही करण्यात आले आहे. मात्र, ही जागा सरकारी असल्यामुळे तसेच जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता हा व्यवहार झाल्याचे सुहाना खान अडचणीत सापडली आहे.





अलिबाग तालुक्यातील थळ येथील सरकारी मालकीच्या जमिनीची विक्री बॉलीवूड आयकॉन शाहरुख खानची मुलगी सुहाना खान हिला शर्थभंग करून कथित बेकायदेशीरपणे विक्री केल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व वकील ॲड. विवेक ठाकूर यांनी दोन वर्षे पाठपुरावा करून पुराव्यांसह शासनाकडे या घोटाळ्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

थळ येथे समुद्रकिनारी असलेली सर्व्हे क्र. ३४५/२, क्षेत्रफळ ०.६०.७० हे.आर जमीन सन १९६८ मध्ये कडक ना विक्री कलमाअंतर्गत लागवडीसाठी मंजूर केलेली सीआरझेडमधील जमीन खोटे कुटूंबाने जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय केवळ साठेकराराव्दारे १२.९१ कोटी रुपयांना विकली असल्याची तक्रार ड. विवेक ठाकूर यांनी शासनाकडे दाखल केली आहे. या तक्रारीत महसूल अधिकारी, उपनिबंधक आणि साक्षीदारांवर संगनमत, सीआरझेडचे उल्लंघन, खोटे तपासणी अहवाल सादर करणे आणि कोट्यवधी रुपयांचा राज्य महसूल लपवल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने सर्व विक्री कागदपत्रे रद्द करण्याची, भरपाईशिवाय जमीन सरकारजमा करण्याची आणि अनेक उच्चस्तरीय आदेशांना न जुमानता कारवाई करण्यास उशीर करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसह सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

थळ सर्व्हे क्र. ३४५/२, क्षेत्रफळ ०.६०.७० हे.आर. ही जमीन १९६८ मध्ये लागवडीसाठी अटींसह नारायण विश्वनाथ खोटे यांना देण्यात आली होती. त्या जमिनीला जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय इतर वापरास व विक्रीस बंदी होती. १९६८-६९ साली या जमिनीची लागवडीसाठी वापर व झाडे लावण्यासाठी नारायण विश्वनाथ खोटे यांना शासनाकडून परवानगी देण्यात आली होती. ही जमिन देताना जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या परवानगीशिवाय विक्री/तबादला/गहाण व्यवहार बंदी अशी प्रमुख अट नमूद केली होती. त्यानंतर नारायण विश्वनाथ खोटे यांचे वारस असलेल्या अंजली खोटे, रेखा खोटे व प्रिया खोटे यांनी ही जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केला होता. मात्र त्यावर अद्यापही परवानगी मिळालेली नाही.

वारस अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी १ जून २०२३ रोजी १२.९१ कोटी रुपयांना सुहाना शाहरूख खान हिला नोंदणीकृत साठेकराराद्वारे वर्ग-२ ची जमीन बेकायदेशीरित्या विकली. यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांची परवानगी घेतली नाही. जमीन हस्तांतरणासाठी अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी १४ फेब्रुवारी २०२२ मध्ये वर्ग २ ते वर्ग १ करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे अर्ज केला. परंतु या अर्जानुसार त्यांना परवानगी दिलेली नाही हे माहिती अधिकारामध्ये उघड झाले आहे. महसूल विभागाच्या कायदेशीर परवानगीशिवाय साठेकराराव्दारे १२.९१ कोटीला सुहाना शाहरूख खान यांना ती जमिन विक्री करण्यात आली.

या जागेत अनधिकृत बांधकामे (घर नं. १७७०, १७७१, ३६७) करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी नाही. तरीही तत्कालीन मंडळ अधिकारी आर.एन. मांढरे यांनी जमिनीवर कोणतीही बांधकामे नाहीत, असा खोटा अहवाल तहसिलदार यांच्याकडे सादर केला. या अहवालातील पंचनाम्यावरील सह्या करणाऱ्या व्यक्ती सुहाना शाहरूख खान यांच्या वडिलांच्या कंपनीशी निगडीत असल्याचा ॲड.ठाकूर यांचा आरोप आहे. तसेच माजी मंडळ अधिकारी आर. एन. मांढरे यांच्यावर खोटी माहिती व तपासाचा गैरवापर केल्याचा तसेच सब-रजिस्ट्रार व महसूल कर्मचारी यांचे संगनमत असल्याचा आरोप तक्रारदार ॲड.ठाकूर यांनी केला आहे.

# ग्रामपंचायत न्हावे उपसरपंचासह, महाड तालुक्यातील वडघर मधील ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश



**दै.रायगड नगरी । माणगाव**

काहीच दिवसांपूर्वी माणगाव मध्ये शिवसेनेचे राज्य प्रवक्ते राजीव साबळे यांनी मोठा गाजावाजा करत माणगाव तालुक्यातील अनेक शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षातून अजितदादांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश घेतला होता. मात्र पक्षप्रवेशाच्या दिवसा-पासूनच राजीव साबळे यांच्याबरोबर जाणाऱ्या कार्यकर्त्यांना गलती लागली. अनेक प्रवेश कर्त्यांची नावे चुकीचे असल्याचे किंवा विश्वासात न घेता पक्षप्रवेशात दाखवल्याचे आरोप करण्यात आले आणि आता काही दिवस उलटत नाही तोच माणगाव तालुक्यातील न्हावे ग्रामपंचायत मधील नागरिकांनी राष्ट्रवादीचे घड्याळ बाजूला सारत शिवसेनेचा झेंडा पुन्हा आपल्या हाती घेतला आहे

राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री नामदार भरत शेठ गोगावले यांच्या निवासस्थानी जात न्हावे गावचे उपसरपंच आशिष बटावळे, माजी उपसरपंच अक्षय पोस्टे, सतीश भोसले, ग्रामपंचायत सदस्या मयुरी पोस्ट, अभिजीत ढेपे, सहदेव उतेकर, प्रेम अंधेरे, विवेक उतेकर, रुपेश पोस्ट, दशरथ जांबरे, भगवान पोस्ट, संजय पोस्ट, रोहन पोस्टे, विठू पोस्ट, लक्ष्मण अंधेरे, ज्ञानेश्वर अंधेरे, धीरज बटवळे, अनिकेत बटवळे, किरण सत्वे, हेमंत उतेकर, यांनी नवनिर्वाचित राष्ट्रवादी आणि महिना पूर्वीचे उबाटाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षाचे उपनेते, राज्याचे रोजगार हमी फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री नामदार भरत शेठ गोगावले यांच्या उपस्थितीत शिवनेरी येथे शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

न्हावे गावच्या या नागरिकांच्या पक्षप्रवेशाने मोठ्या थाटामाटात शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादीचे घड्याळ हातात बांधणाऱ्या राजीव साबळे यांना हा मोठा धक्का मानला जात आहे तर दुसरीकडे महाड तालुक्यातील स्नेहल जगताप कामत यांच्या बरोबर ठाकरे गटातून राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये पक्षप्रवेश घेतलेले आणि वडघर गावचे उपाध्यक्ष प्रकाश शिवराम चौधरी यांनी आपल्या सहपरिवारासह राष्ट्रवादीचे घड्याळ बाजूला सारत शिवसेनेचे धनुष्यबाण हाती घेतले आहे

या पक्षप्रवेशवेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसालकर, शिवसेना जिल्हा संघटक अरुण चालके, यांच्यासह मानगाव तालुका शिवसेना तालुकाप्रमुख, महिला आघाडी तालुकाप्रमुख, युवा सेना पदाधिकारी उपस्थित होते, तर दुसरीकडे वडघर गावच्या प्रकाश चौधरी यांच्या पक्षप्रवेश यावेळी, उपतालुकाप्रमुख समीर उर्फ अण्णा महामुनकर, वन विभाग संपर्कप्रमुख लक्ष्मण भोसले, माजी जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर, वरंध विभाग संघटक सुहास दिविलकर , उपविभाग प्रमुख राजेंद्र देशमुख, इत्यादी पदाधिकारी आणि शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोमसाप रायगड जिल्हा अध्यक्षपदी संजय गुंजाळ तर केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या अध्यक्षपदी संजय गुंजाळ तर केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी यांची बिनविरोध निवड झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा येथे झालेल्या कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाली, त्यामध्ये अध्यक्ष : संजय गुंजाळ, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी : गणेश कोळी, उपाध्यक्ष : पुरुषोत्तम मुळे, कार्यवाह: संजय



होळकर, कार्याध्यक्षा : रेखा कोरे, कोषाध्यक्ष: ॲड.गोपाळ शेळके, जिल्हा समन्वयक: सुखद राणे तर कार्यकारिणी सदस्य : धनंजय गद्रे, सुभाष कुडके, मच्छिंद्र म्हात्रे, रामजी कदम, सौ प्रविता माने, रमेश धनावडे, गंगाधर साळवी, सौ ज्योत्स्ना राजपूत,लवेंद्र मोकल तर महिला प्रमुख : सौ संध्या दिवकर युवाशक्ती प्रमुख : सिद्धेश लखमदे यांची निवड झाली. उर्वरित कार्यकारणीतील पदाधिकारी व सदस्यांची नावे लवकरच जाहीर करण्यात येतील.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी नूतन कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# बोर्लीपंचतन परिसरातील मोबाईल कंपन्यांची सेवा वाऱ्यावर

**दै.रायगड नगरी । कापोली**

मोबाईलच्या सवयींमुळे मनुष्य प्राण्याला जडलेल्या रोगाने ऑनलाईनच्या दुनियेत मोबाईलवरून कोणतीच कामे वेळेवर होत नसल्याने गेल्या अनेक दिवसांपासून नागरिक पार वैतागले आहेत.आणि त्यातच श्रीवर्धन तालूक्यातील बोर्लीपंचतन, कापोली,दिवेआगर, शिस्ते, वडवली, वेळास,भरडखोल या गावांमध्ये मोबाईल नेटवर्क देणाऱ्या एअरटेल, व्होडाफोन, आयडिया या सेवेचा मागील काही महिन्या पासून फज्जा उडाला असून ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या सेवेकडे कोणतेही अधिकारी चांगल्या व अखंडित सेवेसाठी तत्पर दिसत नसल्याने दूरध्वनी व मोबाईल नेटवर्किंग सेवेबाबत परीसरात प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.

कायम गजबजणारी श्रीवर्धन तालुक्यातील मध्यवर्ती असणारी बोर्लीपंचतनही परिसरातील मोठी बाजारपेठ आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन सोबतच परिसरातील पर्यटन स्थळ असलेले दिवेआगर तसेच वेळास, कापोली, शिस्ते, कोंढेपंचतन, वांजळे, भरडखोल, वडवली, तसेच इतरही छोटी मोठी गावे आहेत.

इंटरनेटच्या युगात सर्व कार्यालये, महाविद्यालये ऑन लाईन पद्धतीने जोडली गेली आहेत. परंतु सध्या एअरटेल, व्होडा फोन, आयडीया मोबाईल कंपनीच्या सेवेला घरघर लागली असून नेटवर्क असुनही नसण्याचे प्रकार वाढले आहेत.

मागील वर्ष भरा पासून मोबाईल नेटवर्क कासव गतीने चालत असुन होणाऱ्या सेवेकडे संबधित कंपन्यांमधील अधिकारी सोयिस्कररित्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे भागातील नागरिकांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे एअरटेल, व्होडाफोन, आयडिया, अशा स्वरूपातील असलेली मोबाइल नेटवर्क किंवा इंटरनेट सेवा गेल्या वर्षापासून साफ कोलडमली असल्याचे दिसत असून,

सामान्य जनतेला याचा प्रचंड त्रास होत आहे. बाजारपेठेत ऑनलाइन व्यवसाय करणा-या सर्वांना सध्या या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शिवाय संपूर्ण परीसरात कासव गतीने नेटवर्क चालत असल्याने ग्राहकांकडून प्रत्येक महिन्यात मारावा ला-गणारे रिचार्ज पैसे वाया जात आहेत ह्याला जबाबदार कोण असा सवाल ग्राहकांकडून उपस्थितीत केला जात असून कंपन्यांविरुद्ध तीव्र नाराजी पसरली आहे. जीओ नेटवर्कचे देखिल वेगळे असे काही नाही. मध्येच नेट तर जातोच पण फोन कॉलही ड्रॉप होण्याचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. फोनवर बोलता बोलता अनेकदा फोन कट होत असल्यामुळे धड फोनवरही बोलणं होत नाही. महागाईच्या काळात आधीच लोकं कंगाल आहेत. त्यातूनही नाईलाजाने ग्राहक महिन्याचे पूर्ण पैसे भरूनही संबंधित कंपन्यांना ग्राहकांना अखंड सेवा पुरवण्यासाठी वेळ नाही .संबंधित अधिका-यांकडे संपर्क केला असता काही दिवसाने सेवा अधिक चांगली व जलद होईल अशी असमाधानकारक उत्तर देत चालढकल करून वेळ मारून नेतात. तर वारंवार तक्रार देऊनही मोबाइल कंपन्या लक्ष नसल्यासारख्या अविर्भावात आहेत. वारंवार तलाठी ऑफीस, ग्रामपंचायत यांच्याकडेही सामान्य जनतेने तक्रार मांडली आहेच, हिच तक्रार जागृत नागरिकांकडून टेलिकॉम कंपन्यांना सुध्दा दिली आहे. परंतू तक्रार निवारण काहीच होताना दिसत नाही. कोलमडलेल्या अवस्थेत मोबाइल कंपन्या उभ्या आहेत, यासर्वांकडे जातीने लक्ष देणे गरजेचे आहे, नाहीतर बोर्लीपंचतन परिसराची अवस्था कणा मोडल्यासारखी राहील. ग्राहक सर्वच दुरध्वनी व मोबाईल सेवेला त्रासली असून कंपनी सुरळीत व उत्तम दर्जाची सेवा केव्हा देणार ? ह्या सा-या प्रकारात ग्राहकांची घुसमट होत आहे.